(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XV / Issue – I ISSN 2277-8063

# गांधीवादी राजकीय विचार : पंचायत राज व्यवस्थेची आवश्यकता काल, आज आणि उद्या

**प्रा. डॉ. वैजनाथ गोरोबा सुर्यवंशी**, राजा शिवछत्रपती कला आणि वाणिज्य, महाविद्यालय, महागाव ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर मो. नं ८३६९८२१४८०, E-Mail: svaijanath.05@gmail.com

---

**सारांश** :-

ब्रिटिश कालीन उदारमतवादी व्हाईसरॉय लॉर्ड रिपन १८८० ते १८८४ या दरम्यान ते भारतात गव्हर्नर जनरल म्हणून कार्यरत होते. तेव्हा त्यांनी पंचायत राजची मुहूर्तमेढ रोवली म्हणून त्यांना आपण भारताच्या पंचायत राजचे जनक असे म्हणतो. त्यांनी भारतात सामाजिक कल्याणावर व सामाजिक विकासावर भर देऊन स्थानिक लोकांना पंचायत राजची व्यवस्था शिकविली. तसे कार्य केले. त्यामुळे आज पंचायत राज व्यवस्था इतकी प्रगल्भ झालेली दिसून येते. पंचायतराज व्यवस्था आज लोक चळवळ झालेली आहे. ते आपण पुढील प्रमाणे लेखात पाहणार आहोत.

**प्रस्तावना** :-

पंचायत शब्दाला प्राचीन गोडवा आहे. हा एक सुंदर शब्द आहे. त्याचा शब्दशः अर्थ असा की, ग्रामस्थांनी पसंत केलेल्या पाच इसमांची सभा म्हणजे पंचायत होय. भारतात असंख्य ग्रामीण लोकसत्ताक राज्य ज्या पद्धतीने चालवली जात त्या पद्धतीची पंचायत ही प्रातिनिधीक आहे. महात्मा गांधीजींनी सबंध भारतातील प्रांतिक काँग्रेसच्या सदस्यांना काही सूचना केल्या होत्या. त्यानुसार त्या सूचना पुढील प्रमाणे होत. एक, प्रांतिक काँग्रेस समितीच्या लेखी मंजुरी शिवाय एकही पंचायत स्थापन करू नये. दोन, गावात प्रथम दवंडी पिटून, जाहीर सभा घेऊन, तिचा उद्देश सर्वांना जाहीर करून नंतर पंचायत निवडण्यात यावी. तीन, तिची शिफारस तहसील तालुका कमिटीने करावी. चार, अशा पंचायतीकडे फौजदारी कामे चालवण्याचा अधिकार असू नये. पाच, पक्षकारांनी स्वखुशीने आपले दावे पंचायतीकडे फैसला करण्यासाठी दिले तरच पंचायतीने त्याबद्दल निवाडा द्यावा.सहा, पंचायतीकडे कोणतेही वादग्रस्त प्रकरण सोपविण्याची कोणावरही सक्ती होऊ नये. सात, एकाही पंचायतीला दंड करण्याचा अधिकार असू नये किंवा दिवाणी दाव्यामध्ये पंचायतीचे खरे बळ म्हणजे तिचा नैतिक अधिकार, नि:पक्षपातीपणा आणि पक्षकारांची स्वखुशीने मान्यताच होय. आठ, बहिष्काराचा, वाळीत टाकण्याचा असा प्रकार होऊ नये. नऊ, पंचायतीने गावातील मुला मुलींचे शिक्षण, आरोग्य,औषध पाण्याची तजवीज, गावातील विहिरी व तळे स्वच्छ राखावे. अशा पद्धतीचे सविस्तर मार्गदर्शन आम्हाला महात्मा गांधीजींनी केलेले आहे. त्यामुळे त्यांचा प्रांजळपणाने उद्देश असा होता की, भारतात या पंचायत राज व्यवस्थेमुळे नव्याने रामराज्य उदयास येईल असा त्यांचा हेतू होता. कारण त्यांनी ग्राम विषयी अत्यंत बारीक-सारीक गोष्टींचा विचार मांडलेला आहे. वरील प्रमाणे नऊ कलमात ज्या शर्तींचे पालन करण्यासाठी पंचायतीला सहा महिन्याच्या मुदतीत करणे शक्य झाले नाही तर अशा ग्रामपंचायतीला किंवा पंचायतीला रद्द किंवा बरखास्त करावी आणि तिच्या जागी नवीन पंचायत स्थापन करावी असा मोलाचा सल्ला त्यांनी आपल्या "यंग इंडियाड" हे साप्ताहिक जे की साबरमती येथून प्रकाशित होत. त्यामध्ये त्यांनी दिनांक २८/०५/१९३१ रोजी दिला होता.

वरील प्रमाणे महात्मा गांधीजींनी दिलेल्या सल्ल्याचा विचार केला तर आपल्या लक्षात येते की, पंचायतीला दिलेला सल्ला हा प्रांतिक काँग्रेस समितीच्या मंजुरी शिवाय एकही पंचायत स्थापन करता येणार नाही. गावात प्रथम दवंडी पेटवून, जाहीर सभा घेऊन, तिचा उद्देश जाहीर करून, फौजदारी व दिवाणी दावे न चालवता पक्षकारांनी आपले दावे न्यायनिवाडे स्वखुशीने दिले तरच त्यावर न्याय निवाडा पंचायतीने द्यावा. अन्यथा देऊ नये. पंचायतीने बहिष्कारचा किंवा वाळीत टाकण्याचा वाईट अघोरी प्रकार करू नये. असा बहुमोल सल्ला महात्मा गांधीजींनी आम्हाला दिलेला आहे. स्वातंत्र्यानंतर आपल्या देशाने २ ऑक्टोबर, १९५९ रोजी तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी राजस्थानातील नागोर जिल्ह्यातील बागदरी गावात पंचायत राज व्यवस्थेची कोणसीला,आधारशिला उभी केली. त्याचा प्रभाव संपूर्ण भारतभर झालेला आज आपल्याला दिसून येतो. आज आपल्याला असे दिसून येते की इतर मागास प्रवर्गाच्या आरक्षणासाठी पंचायत राज व्यवस्थेच्या निवडणुका साधारणपणे आठ वर्ष नऊ वर्ष रखडलेल्या आणि नव्यानेच सुरू झालेल्या दिसून येतील. आगामी काळात होऊ घातलेल्या निवडणुका या लोकशाहीला मारक की तारक अशा अवस्थेत सापडलेल्या दिसून येतात. कारण पंचायत राज व्यवस्थेच्या निवडणुका या केवळ पैसा आणि धन दांडग्या लोकांच्या पुरत्याच राहिलेल्या आहेत. त्यामुळे गांधीजींच्या स्वप्नांच्या भारताची प्रतिमा आपल्याला दिसून येणार नाही. कारण त्यांनी असे

म्हटले होते की, समाजातील शेवटच्या परिघाचा विकास झाला पाहिजे तो मुख्य प्रवाहात आला पाहिजे असा त्यांचा उद्देश होता.

स्वातंत्र्यपूर्व काळातील पंचायत व्यवस्था पाहिल्यानंतर आज आपल्या पंचायतीचा विचार केला तर आपल्या लक्षात येते की, भारतीय समाजातील काही मोजकेच लोक पंचायतीमध्ये नेतृत्व किंवा कार्य करताना दिसून येतात. जसे की आरक्षणाच्या माध्यमातून जरी त्यांच्या गटात, गणात,वार्डात उलटफेर झाला तरी पत्नीला, आईला, मुलीला, सुनेला राजकारणात उमेदवारी देऊन पद आपल्याच घरात आले पाहिजे. असा आजच्या राजकारण्याचा हट्ट आहे. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पद, पंचायत समितीचे सभापतीपद, ग्रामपंचायतचे सरपंच पद शेवटी आपल्याकडेच आले पाहिजे. एवढे करून पद आपल्याकडे आले नाही. तर आपले स्वकीय सहाय्य करणारे कार्यकर्ते त्यांना आपल्या हाताशी धरून ते आपल्या नियंत्रणात कसे राहतील यासाठी सर्व राजकारणी धडपडताना दिसून येतात. आगामी काळात पंचायत व्यवस्था एका वेगळ्या परिघात दिसून येईल जसे की गव्हर्नरच्या माध्यमातून शासन जनतेच्या दारी जात कार्य कर्तांना दिसून येईल. जनतेच्या सोयी,सुविधा, अडचणी घरबसल्या लोकप्रतिनिधीच्या मेलवर किंवा संपर्क साधनावर पाठवतील.

उद्याची पंचायतराज व्यवस्था ही डिजिटल इ- गव्हर्नन्स आणि सहभागी शाश्वत विकासावर केंद्रीभूत असेल. ०२ ऑक्टोबर, २०२५ पासून राबवल्या जाणाऱ्या "लोकसहभाग योजना" अभियान २०२५-२६ (सबकी योजना सबका विकास) याद्वारे पंचायत विकास योजना (PDPS) अधिकाधिक सक्षमपणे सक्रिय कार्य करणार आहेत. भविष्यात लोकाभिमुख सक्षमपणा होणार आहे. ग्रामीण भागात तंत्रज्ञानाचा वापर वाढवून पारदर्शक प्रशासन, महिला सक्षमीकरण, शिक्षण, आरोग्य आणि डिजिटल रूपांतरणावर भर दिला जाणार आहे असे निदर्शनास येते कारण तशी परिस्थिती आगामी काळात नक्कीच येईल.

**पारिभाषिक शब्द :-**

इसम, परवली, दवंडी, सभा, वाळीत, तजवीज, अघोरी, शाश्वत, प्रशासन, फैसला, कोणसीला.

**उद्दिष्टे** :-

प्रस्तुत शोधनिबंधात गांधीजींच्या ग्राम राज्यापासून धडा घेऊन शिकून अनुभव घेऊन आपण आजपर्यंत प्रामाणिक प्रयत्न करून वाटचाल केलेलीच आहे. पण आगामी काळात आणि सध्याच्या परिस्थितीत पंचायत राज व्यवस्थेत अमुलाग्र बदल झालेले दिसून येतील. तो बदल शोधण्याचा प्रयत्न करणार आहे. सध्या परिस्थितीत पंचायत राजच्या जो मध्यम स्तर आहे पंचायत समिती तिच्या प्रतिनिधींना म्हणावे तितके अधिकार राहिलेले नाहीत. पंचायत समितीच्या सभापतीला विधान परिषदेत मतदान करण्याचा अधिकार असला पाहिजे का? याचा शोध घेण्याचा प्रयत्न करणार आहे. राज्यात आणि देशात पंचायत राज व्यवस्थेची आवश्यकता आहे का नाही? याचा शोध घेणार आहे. आणि जर आवश्यकता असेल तर ती का आहे? याचा शोध घेण्याचा प्रयत्न करणार आहे.

**ग्रहीतके** :-

१) स्वातंत्र्यपूर्व काळात पंचायत राज व्यवस्थेची आवश्यकता होती.

२) आज पंचायत राज व्यवस्थेची आवश्यकता आहे.

३) उद्या पण पंचायतराज व्यवस्थेची आवश्यकता आहे.

**विषय विवेचन :-**

पंचायत राज व्यवस्थेच्या आवश्यकतेचा शोध घेत असताना त्याच्या चोहोबाजूने विचार केला तर आज घडीला ग्रामपंचायत पंचायत समिती जिल्हा परिषदेच्या कामकाजात ई-पंचायत प्रणालीचा जास्तीत जास्त वापर होत असलेला दिसून येतो. म्हणजेच एका अर्थाने डिजिटल आणि स्मार्ट पंचायत असा उल्लेख केला तर वावगे ठरणार नाही.

केंद्र शासनाने २०२५-२६ सालापासून संपूर्ण भारतात ग्रामीण स्तरापासून ग्रामसभेत "सबकी योजना सबका विकास" अंतर्गत ग्रामपंचायत विकास योजना राबवताना दिसून येते. तशा पद्धतीचे PDPS आखणी केलेली आहे. जेणेकरून भारतातील सामान्यातील सामान्य माणसाला वाटले पाहिजे की, ही योजना आमच्या हिताची आहे. आमच्या कल्याणाची आहे. आमचे काही भले होणार आहे. याची जाणीव जनतेला वाटली पाहिजे असा भारत सरकारचा प्रयत्न आहे.

महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान योजना राबवून योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी स्पर्धात्मक वातावरण तयार करून समाजात उत्तम काम करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्याचबरोबर शाश्वत विकासाचे

ध्येय साध्य करण्यासाठी SDGS ग्रामीण भागात पायाभूत सुविधा पुरविण्याचा त्याचबरोबर नैसर्गिक साधन संपत्ती, मानव कल्याण, लोकांसाठी आणि ग्राहकासाठी चा शाश्वत विकासाचा अजेंडा हा जसा संयुक्त राष्ट्र संघटनेने २०३० चे लक्ष ठेवले आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनाने सुद्धा भविष्यात शांती आणि समृद्धीसाठी एक सामायिक ब्ल्यू प्रिंट तयार केलेला आहे. त्या ब्ल्यू प्रिंटच्या केंद्रस्थानी जवळजवळ १७ शाश्वत विकास उद्दिष्टे ठेवलेले आहेत. त्याच्या जागतिक भागीदारीत विकसित आणि विकसनशील अशा सर्व देशांनी जर सामूहिक कृती केली तर संपूर्ण जगातील गरिबी आणि भूक मिटू शकेल. आरोग्य, शिक्षण सुधारणा, आर्थिक वाढीला चालना, हवामान बदलास सक्षमपणे तोंड देणे अशा महत्त्वपूर्ण विषयावर जगातील अनेक देश काम करत आहेत. जे की भारतात स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासून सुरू आहे.

भविष्यातील पंचायत राज व्यवस्थेची वैशिष्ट्ये कशी असतील याचा विचार केला तर ते आपल्या लक्षात येईल की, डिजिटल आणि स्मार्ट पंचायत होईल. ग्रामपंचायतच्या कामकाजात ई पंचायत प्रणालीचा जास्तीत जास्त वापर केला जाईल. तसेच महिला आणि मागासवर्गीयांचे सक्षमीकरण करण्यावर अधिक भर असेल. दुर्बल घटकांचा विकास साधा वर लक्ष असेल. ग्रामसभांच्या माध्यमातून गावाशी संबंधित निर्णय घेण्याचे अधिकार ग्रामपंचायतीला असतील.

२० फेब्रुवारी २०२६ रोजी राज्य शासनाने एक अधिसूचना जारी करून मुदत संपलेल्या ग्रामपंचायती वर विद्यमान सरपंचाची प्रशासक म्हणून तर उपसरपंच व इतर सदस्यांची प्रशासकीय समिती म्हणून नियुक्ती करण्याचे आदेश सर्व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले होते. त्या निर्णयाविरोधात एक जनहित याचिका दाखल केली होती. ग्रामपंचायतच्या कारभारासंदर्भात अति महत्त्वाचा निकाल देत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद, छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने राज्य सरकारला चांगलेच धारेवर धरून असे निर्देश दिलेले आहेत की, राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयामुळे लोकशाही प्रक्रियेवर विपरीत परिणाम होतो. हे लोकशाहीला अतिशय घातक आणि मारक आहे. असा महत्वपूर्ण निर्णय देऊन ज्या ग्रामपंचायतची मुदत संपली आहे. त्या ठिकाणी कोणतीही प्रशासक म्हणून नियुक्ती आदेश जारी करू नये. ज्या ग्रामपंचायत मध्ये अगोदरच अशा प्रकारचे आदेश जारी केलेले आहेत ते तात्काळ रद्द करावेत.

प्रस्तुत शोधनिबंधाचे जे उद्दिष्टे, ध्येय समोर ठेवलेले होते. जे गृहीतके मांडलेली होती त्यानुसार शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. पंचायत राज व्यवस्थेचा जो मध्यम स्तर आहे. त्याचे जे लोकप्रतिनिधी असतात त्यांना म्हणावे तितके अधिकार नाहीत. त्यांच्यापेक्षा ग्रामपंचायतीच्या सदस्यांना आणि जिल्हा परिषदेच्या लोकप्रतिनिधींना अधिकार आहेत. पंचायत समितीच्या आणि जिल्हा परिषदेच्या सदस्यांना विधान परिषदेच्या निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार असावा असे लोकप्रतिनिधीचे मत आहे. मी जेव्हा संशोधन करत होतो त्या वेळेला मुलाखती दरम्यान व्यक्त केलेले वरील विधान आहे. आज अशी परिस्थिती आहे की, देशात आणि राज्यात पंचायत राज व्यवस्थेची अत्यंत आवश्यकता आहे. कारण स्थानिक पातळीवर स्थानिक नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधीची गरज असते. ती लोकप्रतिनिधी स्थानिकची असल्यामुळे त्याला स्थानिक गरजा, स्थानिक अडचणी, स्थानिक समस्यांची जाणीव असते. त्यामुळे त्या समस्यांची सोडवणूक कशा पद्धतीने केली पाहिजे याची त्याला जाण असते. देशात आणि राज्यात काल, आज आणि उद्या पंचायत राज व्यवस्थेची आवश्यक गरज आहे असे दिसते.

**निष्कर्ष** :-

प्रस्तुत शोधनिबंधाचा निष्कर्ष मांडत असताना मला अतिशय आनंद होत आहे की, सदर विषय स्थानिक नागरिकांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा आहे. कारण स्थानिक लोकप्रतिनिधी हे बहुतेक लोकांच्या ओळखीचे असतात. त्यामुळे त्यांचे एकमेकांच्या रोजच्या रोज भेटीगाठी होत असतात म्हणून त्यांना रोजच्या रोज समस्यांची माहिती सांगितली जाते. त्यांचे काम करून घेण्यास थोडासा उशीर झाला तरी नागरिक त्यांना रोज आठवण करून देऊन आपल्या आरोग्याच्या, दिवाबत्तीच्या, शिक्षणाच्या, शेतीच्या, रस्ता, दळणवळणाच्या, शेतीला पाणीपुरवठा योजना, पिण्याच्या पाण्याचा, मुलींच्या शिक्षणाचा, महिलांच्या आरोग्याचा प्रश्न सोडविण्यासाठी सामूहिक प्रयत्न केलेला दिसून येतो. त्यामुळे सदर विषयाचे महत्त्व आणखीनच वाढते. आणि त्याची गरज ही अधिक दिसून येते. म्हणून विषयाचे शीर्षक देत असताना काल, आज आणि उद्या ही या विषयाची आवश्यकता आहे असे आपणास सांगता येईल.

**शिफारशी** :-

१) पंचायत समितीच्या लोकप्रतिनिधींना विधान परिषदेत मतदान करण्याचा अधिकार असावा.

२) पंचायत राज व्यवस्थेच्या लोकप्रतिनिधीचे किमान शिक्षण बारावीपर्यंतचे असले पाहिजे.

**संदर्भसूची** : -

१) News 18 लोकमत E-Paper २८ Feb २०२६.

२) प्रा.व्ही. बी. पाटील, भारतीय राज्यव्यवस्था महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह के. सागर पब्लिकेशन्स, पुणे जुलै २००८.

३) प्रा. व्ही. बी, पाटील, महाराष्ट्रातील पंचायत राज व नागरी स्वराज्य संस्था, के सागर पब्लिकेशन्स पुणे चौथी आवृत्ती २००९.

४) प्रा. सतीश ठोंबरे, महाराष्ट्र शासन आणि जिल्हा प्रशासन, विद्याभारती प्रकाशन लातूर, ५ ऑगस्ट २००३.

५) एखेळीकर रमेश, भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद, १९९९.

६) काकडे सुरेश पंचायत राज प्राची प्रकाशन मुंबई १९९८.

७) गवळी पी.ए. पेशवेकालीन महाराष्ट्र संस्था आणि संकल्पना, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, १८ मे २०००.

८) गोरे नीलम, पंचायतराज मार्गदर्शन स्त्री आधार केंद्र, पुणे १९९९.

९) चौधरी अशोक, दत्तात्रेय व इतर मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ आणि त्या खालील नियम चौधरी लॉ पब्लिशर्स, जळगाव, पुणे २७, वी आवृत्ती २००८.

१०) ठोंबरे सतीश, ग्राम शासन पंचायतराज व नागरी प्रशासन, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथम आवर्ती नोव्हेंबर २०१०.

११) दर्शनकार अर्जुनराव, पंचायत राज प्रशासन, शारदा प्रकाशन वजीराबाद, नांदेड, प्रथम आवृत्ती १९८४.